प्रेसनोट　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　लाा.प्र.वि., नंदुरबार.
दि.०८.०१.२०२६

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नंदुरबार |
| **फिर्यादी** | सरकारतर्फे श्री. प्रशांत चिमणराव भरते, वय ४७ वर्षे, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार. |
| **पोलीस ठाणे व गुन्हा नोंद क्रमांक** | पारोळा पोलीस स्टेशन जि. जळगाव गु.र.नं. ……. /२०२६. |
| **अधिनियम व कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७ प्रमाणे. |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | भाऊसाहेब गोरख पाटील, वय ३३ वर्षे, वरीष्ठ तंत्रज्ञ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, पारोळा, जि. जळगाव. (वर्ग - ३). |
| **लाचेची मागणी रक्कम** | १,५००/- रुपये तडजोडीअंती १,०००/- (एक हजार रुपये) |
| **स्विकारली रक्कम** | १,०००/- रुपये (एक हजार रुपये) |
| **थोडक्यातहकिगत** | यातील मुळ तक्रारदार हे शेतकरी असुन त्यांनी दिनांक २१/०६/२०२५ रोजी त्यांचे पत्नीचे नावे ‘मागेल त्याला सौर कृषी पंप’ योजनेअंतर्गत मौजे पोपटनगर शिवार, पारोळा येथील शेतामध्ये सौर कृषी पंप बसविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस ऑनलाईन अर्ज केला होता. त्यानंतर त्यांचे शेतातील विहिरीचे सर्वेक्षण करण्यासाठी अर्जदार यांना म.रा.वि.वि.कंपनीकडून दिनांक - २०/०९/२०२५ अशी तारीख देण्यात आली होती.<br>सदर सर्वेक्षण करणारे वरिष्ठ तंत्रज्ञ भाऊसाहेब पाटील (आलोसे) यांना तक्रारदार यांनी दिनांक ०४/०१/२०२६ रोजी फोन करून विहिरीचे सर्वेक्षण करण्यासाठी शेतात येण्यासाठी विनंती केली असता आलोसे भाऊसाहेब पाटील हे सर्वेक्षण करण्यासाठी १५००/- रु. लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक ०८/०१/२०२६ ला.प्र.वि., नंदुरबार घटकास समक्ष तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची दिनांक ०८/०१/२०२६ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक भाऊसाहेब गोरख पाटील, वरिष्ठ तंत्रज्ञ यांनी पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे शेतातील विहिरीचे सर्वेक्षण करून देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे १,५०० /- रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १०००/- रु. लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य केले<br>त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक भाऊसाहेब पाटील यांना दि. ०८/०१/२०२६ रोजी चोरवड, तालुका-पारोळा, जिल्हा-जळगाव येथे तक्रारदार यांचेकडून १,०००/- रुपये लाच रक्कम पंच साक्षीदार यांचेसमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे, म्हणुन गुन्हा. |
| **सापळा कारवाई** | **१) पर्यवेक्षण व सापळा अधिकारी** - श्री. प्रशांत भरते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि., नंदुरबार.<br>**२) सापळा पथक** - पो.हवा./ विजय ठाकरे, पोहवा./नरेंद्र पाटील, पोना/हेमंतकुमार महाले, सर्व नेमणुक - ला.प्र.वि., नंदुरबार.<br>**३) तपास अधिकारी** - श्रीमती स्मिता नवघरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., जळगाव. |
| **मार्गदर्शन** | **१) मा.श्री. भारत तांगडे, पोलीस अधीक्षक,ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२) मा. श्री. माधव रेड्डी,अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक. |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार येथे सपंर्क करावा.**


सपंर्क पत्ता :- १२, जयचंदनगर, कोरीट रोड, नंदुरबार.
संकेतस्थळ:- acbmaharashtra.gov.in
ईमेल/ऑनलाईन तक्रार :- spacbnashik@mahapolice.gov.in
टोल फ्रि क्रमांक :- १०६४
दुरध्वनीक्रमांक :- ०२५६४-२३१००९.
व्हॉट्सअपक्रमांक :- ९४२३५ ४१०६४.